**<u>सं.फौ.खटला क्र. २८०/२०२५</u>**
**<u>सरकार वि. रुपचंद</u>**
**<u>निशाणी क्र. १४ खाली</u>**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ ची साक्ष शपथेवर सुरु :-</u>**

**<u>नाव</u> : राधेश्याम नथ्थुजी इनवाते**
**<u>वय</u> : ४५ वर्ष, <u>कामधंदा</u> : शेती,**
**<u>राहणार</u> : सावरा, ता. रामटेक, जिल्हा नागपूर.**

<u>सरतपास शपथेवर सुरु</u> :-
<u>सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती रणवरे यांच्यामार्फत</u> :-

१) दि.१२.०२.२०२५ रोजी पोलिसांनी मला सावरा गावात पंच म्हणून बोलविले होते. त्याबाबत मला संमस दिले होते. आता मला सदरचे संमस दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१५** देण्यात येते. त्यानंतर मी, पोलीस व दुसरा पंच पुस्तकला निरंजन इनवाते असे आरोपीच्या घरी गेलो. तेथे आरोपीला आवाज दिला. त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव रुपचंद चैतराम इनवाते असे सांगितले. त्याच्या घराची झडती घेतली असता, त्याच्या घराच्या मागच्या बाजूला पांढऱ्या रंगाच्या दोन डबक्यामध्ये द्रव्य आढळून आले. त्याचे वास घेतले असता त्यामधून उग्र व आंबट वास येत होता.
२) त्यामध्ये २० लिटर मोहाफुल दारु मिळुन आली. त्यानंतर पोलिसांनी एका काचेच्या शिशीमध्ये १८० एमएल दारु वेगळी काढुन सील बंद करुन त्यावर आमच्या सह्या घेतल्या. पोलिसांनी उर्वरीत दारु जागेवर नष्ट केली. त्यानंतर पोलिसांनी त्याचा पंचनामा माझ्या समक्ष तयार केला. त्यावर वाचुन मी सही केली. आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला. ते तेच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१६** देण्यात येते. आरोपीला बघितल्यास मी ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलट तपास आरोपी तर्फे वकील श्री डोंगरे मार्फत</u>**

३) हे म्हणणे खरे आहे की, मी गावचा पोलिस पाटील आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी यापूर्वी ८ ते १० प्रकरणात साक्षी दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या दर १५ दिवसातुन पोलिस स्टेशनला मिटींग असते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीच्या घरी गेलो नव्हतो व नि.क्र.१६ वर पोलिस स्टेशनला सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी आरोपीकडून २० लिटर मोहाफुल दारु जप्त केली व त्यानंतर पोलिसांनी एका काचेच्या शिशीमध्ये १८० एमएल दारु वेगळी काढुन सील बंद करुन त्यावर आमच्या सह्या घेतल्या, हे मी खोटे सांगत

आहे.  हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे बयाण घेतले नव्हते.  हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिस पाटील असल्याने पोलिसांच्या सांगण्यावरुन आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,

सही/-

रामटेक.

(डी. सी. वोराणी)

दिनांक : ०६/०४/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

कोर्ट नं.२, रामटेक